म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय
दा.क्र. ९२८६



## कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401248
BVBK-0401248

# व्यायाम-भीष्माचार्य

# व्यायाम-भीष्माचार्य

कांहीं नवीन वेंबकसरा : ७

•

हिराजी पाटील
प्राचार्य, शा. शि.
महाविद्यालय, धुळें.

म. मं. ...
१२८६ दि. २०।५।६७
वा. वा.
विषय

BVBK-0401248
BVBK-0401248

पन्नास नये पैसे

卐卐卐卐卐卐卐卐卐



वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २.



बडोद्याचे राजरत्न प्रो. माणिकराव हे केवळ एक उत्तम मल्ल होते, नुसते व्यायाम-प्रचारक होते अशी समजूत त्यांचें समग्र चरित्र माहीत नसणाराची होणें साहजिक आहे. परंतु ते एक थोर समाजसेवक होते आणि अस्सल देशभक्त होते याची जाणीव हें चरित्रपुस्तक वाचून अवश्य होईल. धुळयाच्या शा. शि. महाविद्यालयाचे प्राचार्य हिराजी पाटील यांना त्यांचा प्रत्यक्ष सहवास लाभला होता. प्राचार्य पाटील यांनीं या थोडयाशा पानांत त्यांचें यथातथ्य चित्र वाचकांसमोर उभें केलें आहे; आणि तें पुरेसें बोलकें आहे, यांत कांहीं शंका नाहीं.

श्री : १५४ : २[१०-६१]

© १९५९
वोरा अ‍ॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा अ‍ॅण्ड कंपनी
पब्लिशर्स, प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता,
मुंबई २.

आवृत्ति दुसरी : १९६१

मूल्य ५० नये पैसे

मुद्रक :
अनंत जे. शाह
लिपिका प्रेस,
कुर्ला रोड, अंधेरी
मुंबई ५९

# व्यायाम-भीष्माचार्य प्रो. माणिकराव

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

१९०६ सालची गोष्ट. दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखालीं कलकत्त्यास कॉंग्रेसचें अधिवेशन भरणार होतें. त्यावेळीं देशी-विदेशी खेळांचीं मोठमोठीं प्रात्यक्षिकें श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखालीं होणार होतीं. लोकमान्य टिळक, दादासाहेब खापर्डे, शिवरामपंत परांजपे, गंगाधरराव देशपांडे आदि थोरथोर पुढारी मंडळीहि हजर होती. प्रात्यक्षिकांसाठीं भारतांतील मोठमोठ्या आखाड्यांतून खूप खेळाडू आले होते. इंग्लंड, जपान, फ्रान्स व अमेरिका येथूनहि कांहीं खेळाडू आले होते.

प्रात्यक्षिकांना सुरुवात झाली. मल्लखांब, कुस्ती, बनेटी आदि खेळांचीं नयनमनोहर अशीं प्रात्यक्षिकें झालीं. आतां खड्गयुद्धाचें प्रात्यक्षिक होणार होतें. त्यासाठीं भारतांतील निरनिराळ्या ६४ आखाड्यांतून एका तरुण खेळाडूची निवड झाली होती. भारतांतील सर्व खेळाडूंना नामोहरम करून तो विजयी झाला होता. परदेशांतील खेळाडूंबरोबर आतां त्याचा सामना होणार होता. जपान, इंग्लंड व फ्रान्स येथील खेळाडू त्याच्याबरोबर खेळण्यास तयार नव्हते. कारण त्यावेळीं आपण जित होतों व ते जेते होते. 'गुलामां'शीं लढणें त्यांना कमीपणाचें वाटलें असावें! अमेरिकन खेळाडू मात्र खेळण्यास तयार झाला. एक

भलामोठा लोखंडी गोळा एका दंडावरून दुसऱ्या दंडावर अलगत फेंकीत फेंकीत तो मैदानावर उतरला. प्रेक्षकांनीं टाळ्यांचा कडकडाट केला. त्याची ती प्रचंड ताकत पाहून एकाद्याला धडकीच भरावी !

भारतीय खेळाडूहि पांढऱ्या शुभ्र पोषाखांत पुढें आला. भरलेल्या छातीचा आणि तेजःपुंज शरिराचा तो तरणा-बांड असा गडी होता. प्रचंड देहाच्या त्या अमेरिकन खेळाडूपुढें मात्र तो बुटकाच दिसला. दोघांच्या हातांत नंग्या तलवारी होत्या. दोघेहि समोरासमोर उभे ठाकले. खूण होतांच युद्धाची सलामी झाली. नजरेला नजर भिडली. प्रतिस्पर्ध्याकडे पाहून भारतीय खेळाडूनें स्मितहास्य केलें. त्याला सुचवायचें होतें-'मित्रा, शूराला शूराबरोबर लढण्यांतच खरा आनंद. ती संधि आपणां दोघांनाहि मिळाली आहे.'

अमेरिकन खेळाडूनें प्रथम वार करावयाचा व भारतीय खेळाडूनें प्रतिकार करावयाचा असें ठरलें. सर्व शक्ति एकवटून त्यानें वार केला. पण भारतीय खेळाडूनें इतक्या सफाईदारपणें तो चुकविला कीं लोक पाहून थक्क झाले. एकामागून एक असे तीन वार झाले. पण तीनहि वार वायां गेल्यामुळें अमेरिकन खेळाडू हिरमुसला झाला. भारतीय खेळाडूचें तें चापल्य आणि नैपुण्य पाहून प्रेक्षक बेहोष झाले. भारतीय खेळाडूनें आतां वार करण्याची संधि मागितली. पण परीक्षक समितीनें सांगितलें, "आतां त्याची जरुरी नाहीं." भारतीय खेळाडू विजयी झाला, असें जाहीर

करण्यांत आलें. तें ऐकून प्रेक्षकांनीं टाळ्यांचा एवढा प्रचंड कडकडाट केला कीं बराच वेळ तो आवाज आसमंतांत घुमत राहिला. कांहीं उत्साही लोकांनीं भारतीय खेळाडूस खांद्यावर घेऊन नाचविलें.

कोण होता हा खेळाडू ? आम्ही 'जित' असलों तरी वीर आहोंत, शूर आहोंत हें आपल्या कृतीनें दाखवून देणारा हा गडी कोण होता ? त्या खेळाडूचें नांव होतें जगन्नाथ यशवंतराव माणिक. बडोद्याचे सुप्रसिद्ध व्यायामपटु प्रो. माणिकराव ते हेच. प्रो. माणिकरावांचें माणिक हें आड-नांव असलें तरी मूळचे ते ताम्हणे. ताम्हण्यांचे माणिक कसे झाले ही एक मजेदार कथा आहे.

**ताम्हण्यांचे माणिक कसे झाले ?**

काठेवाडांत माणिकवाडा म्हणून एक भाग आहे. या भागांत मातब्बर झालेल्या माणिकबंधूनीं बंड करून बडोद्याच्या गायकवाडांना त्रास देण्यास सुरुवात केली. त्यावेळीं बडोद्यास दुसरे सयाजीराव महाराज राज्य करीत होते. त्यांनीं त्यांचे शूर शिलेदार रावजी ताम्हणे – म्हणजे प्रो. माणिकरावांचे पणजे – यांवर तें बंड मोडण्याची काम-गिरी सोंपविली. रावजी ताम्हणे यांनींहि आपल्या शौर्यानें आणि अक्कलहुशारीनें बंडाचा बीमोड केला आणि विन्धा माणिक, सिन्धा माणिक आदि नऊ माणिकबंधूंना पकडून श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या पायाशीं आणून सोडलें. रावजींच्या पराक्रमावर महाराज खूष झाले व त्यांनीं रावजींना "माणिक" हा किताब बहाल केला.

आणि त्या दिवसांपासून त्यांनीं ताम्हणेऐवजीं माणिक हें उपनांव लावण्यास सुरुवात केली. या रावजींच्या नांवानेंच बडोद्याच्या एका भागाला 'रावपुरा' व त्यांचे बंधू बाबाजी यांच्या नांवानें दुसऱ्या एका भागाला 'बाबाजीपुरा' असें नांव पडलें आहे.

प्रो. माणिकरावांचे वडील यशवंतराव मोठे ठेकेदार ( कॉंट्रॅक्टर ) होते. व्यायामाची त्यांना लहानपणापासूनच गोडी. घोड्यावर बसणें, दांडपट्टा फिरविणें वगैरे गोष्टींची त्यांना अतिशय आवड. आपल्याहि मुलांनीं व्यायाम करून शरीर सुदृढ करावें व निरनिराळ्या खेळांत प्रवीण व्हावें असें त्यांना नेहमीं वाटे. यशवंतरावांना एकूण पांच मुलगे व दोन मुली झाल्या. त्यांपैकीं गजानन हा दुसरा. लहानपणापासूनच तो निरोगी व सुदृढ. बालपणापासून त्याला खेळांचा व कुस्तीचा नाद. त्यावेळीं त्याला कोणीं विचारावें, "गजानन, तूं कोण होणार ?" त्यानेंहि छाती पुढें काढून उत्तर द्यावें, "मी पहिलवान होणार."

**महाराजांसमोर सूरपारंबीचा खेळ**

गजानन नऊ वर्षांचा असतांनाची गोष्ट. तो व त्याचा मित्र काळू नजरपागेंतील चिंचेच्या झाडावर एकदां सूरपारंबीचा खेळ खेळत होते. त्यावेळीं त्याच रस्त्यानें श्रीमंत सयाजीराव महाराज घोड्यावर बसून राजमहालाकडे चालले होते. झाडाच्या एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर सफाईदारपणें उड्या मारणाऱ्या त्या मुलांकडे त्यांचें सहज लक्ष गेलें. त्यांनीं क्षणभर घोडा थांबवला. मुलें खेळांत गर्क

होतीं. माकडांसारखीं लीलेनें इकडून तिकडे उड्या मारीत होतीं. त्यांचें तें चापल्य पाहून महाराज खूष झाले व महालाकडे गेले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं एक शिपाई शोध करीत करीत यशवंतरावांच्या घरीं आला. "नजरपागेंतील चिंचेच्या झाडावर काल सूरपारंबीचा खेळ खेळणारा मुलगा तुमचाच काय ?" असा त्यानें त्यांना सवाल केला. यशवंतरावांनीं गजाननास बोलावलें व विचारलें, "गजानन, काल तूं सूरपारंबीचा खेळ खेळलास काय ?"

"होय बाबा," गजानन म्हणाला, "रहिममियांचा काळू व मी रोज खेळतों सूरपारंबी."

शिपाई यशवंतरावांना म्हणाला, "या मुलाला विद्याधिकारी साहेबांनीं बोलावलें आहे."

"कशासाठीं तें ?" यशवंतरावांनीं विचारलें.

"मला कांहींच माहीत नाहीं," शिपाई उत्तरला.

"ठीक आहे. घेऊन जा त्याला," यशवंतरावांनीं परवानगी दिली.

विद्याधिकारी प्रेमळ गृहस्थ दिसले. गजाननाच्या पाठीवर हात ठेवीत त्यांनीं विचारलें, "काल तूं कोणाबरोबर सूरपारंबी खेळत होतास ?"

"रहिममियांच्या काळूबरोबर."

"तुमचा खेळ महाराजांना फार आवडलेला दिसतो. पुन्हां एकदां खेळ पहाण्याची त्यांची इच्छा आहे. खेळाल?"

"हो खेळीन. पण कुठें ? नजरपागेंतील चिंचेच्या झाडांवर ?"

"नाहीं, राजमहालाच्या आवारांतील झाडांवर. मी नेईन तुला राजमहालांत. येशील ?"

"हो हो जरूर."

"मग आज तिसरे प्रहरीं तयार रहा. तुझ्या मित्रालाहि बोलवून ठेव. मी बग्गी घेऊन तुझ्या घरीं येतों. आपण मिळूनच राजमहालांत जाऊं."

विद्याधिकारी साहेबांना नमस्कार करून गजानन घरीं परतला. राजापुढें आपला खेळ होणार या विचारानें त्या मुलांना किती आनंद झाला असेल !

ठरल्याप्रमाणें विद्याधिकाऱ्यांनीं दोन्ही मुलांस राजमहालाच्या आवारांत आणलें. एक घेरेदार वृक्ष निवडला गेला. महाराज व महाराणी सोफा टाकून बसलीं. अधिकारीहि गंमत पहात बाजूला उभे राहिले. खेळ सुरू झाला. गजानन पुढें आणि काळू मागें. शिवाशिवी सुरू झाली. या फांदीवरून त्या फांदीवर दोघेहि लीलेनें उड्या मारीत होते. तब्बल अर्धा तास झाला. पण गजाननाला काळू शिवूं शकला नाहीं. खेळांतील उभयतांची चपळाई पाहून महाराज खूष झाले. महाराजांनीं दोन्ही बालखेळाडूंना जवळ बोलाविलें. शाबासकी दिली. घरची माहिती विचारली. मग दोघांनाहि जरीच्या टोप्या व रोख रकमा बक्षीस दिल्या.

खुद्द राजानें केलेल्या या सन्मानामुळें नऊ-दहा वर्षांच्या त्या चिमुरड्या पोरांना किती धन्यता वाटली असेल !

## शाळेंतील भुताटकी

गजानन पांचवींत शिकत असतांनाची गोष्ट. शाळा एका जुनाट वाड्यांत भरत असे. वाडा खूप मोठा पण पडका होता. या वाड्यांत रोज रात्रीं असा प्रकार घडायचा कीं, शाळेंतील सर्व बाकें व खुर्च्या आपोआप एका खोलींत येऊन पडायचीं. कुलूप तर लावलेलें आणि किल्ल्या मुख्याध्यापकांकडे ! मग असें कसें होतें ? हा भुताटकीचाच प्रकार असावा असें सगळ्यांना वाटे.

गजानन आणि त्याचे मित्र यांनीं या भुताटकीचा शोध लावण्याचें ठरविलें. एका रात्रीं ते गुपचुप शाळेंत लपून बसले. रात्रीचे अकरा वाजले तरी कांहींच हालचाल दिसेना. मुलें चुळबुळ करूं लागलीं. अर्ध्या रात्रीच्या सुमारास "धप्प" असा आवाज झाला. छपरावरून कांहीं तरी पडलें. कांहीं मुलांची छाती धडधडूं लागली. जीव मुठींत धरून पुढचा प्रकार ते पहात राहिले. कोपऱ्या-वरच्या एका खोलीची कडी आंतून उघडली गेली. पावलें वाजूं लागलीं. पांचसहा जण तरी आंत घुसले असावेत. सर्व खोल्यांतील बाकें व खुर्च्या मधल्या खोलींत येऊं लागल्या. बाकांवर बाकें रचून चांगला आडोसा तयार झाला. कोंडाळें करून ते लोक आडोशाला बसले. निर्धास्त-पणें गप्पा सुरू झाल्या. त्यांच्या गप्पांवरून ते भुरटे चोर असावेत हें मुलांनीं ताडलें. गप्पांबरोबर आतां त्यांचें खाणेंहि सुरू झालें.

ठरल्याप्रमाणें गजाननें शीळ घातली. लपलेलीं मुलें बाहेर आलीं. झटापट सुरूं झाली. एक दोघे पळाले.

बाकीच्यांना मुलांनीं चांगलेंच आवळून ठेवलें. मुख्याध्यापकांना बोलविण्यांत आलें. पोलीसहि आले. चोरांना पोलिसांच्या ताब्यांत देण्यांत आलें. मुख्याध्यापकांनीं गजानन व त्याचे मित्र यांना खूप खूप शाबासकी दिली.

### न्याय मिळविला

अशा प्रकारें गजानन वाढत होता. खेळाप्रमाणें अभ्यासांतहि चमकत होता. गणितांत तर तो फारच तरबेज होता. सहाव्या इयत्तेंत असतांनाची गोष्ट. गणितांत तो नापास झाल्याचें त्याला सांगण्यांत आलें. त्याला वाईट वाटलें व आश्चर्यहि वाटलें, पण तो स्वस्थ बसला नाहीं. परीक्षकांची कांहींतरी चूक झाली असावी अशी त्याला पूर्ण खात्री होती. मुख्याध्यापकांच्या परवानगीनें तो विद्याधिकाऱ्यांना जाऊन भेटला व म्हणाला, "माझ्यावर अन्याय झालेला आहे. गणितांत मी नापास होणेंच शक्य नाहीं. कांहींतरी घोटाळा झाला आहे. पाहिजे तर आपण या क्षणीं मला कठीणांतलीं कठीण उदाहरणें टाका. मी सोडवून दाखवितों."

त्याच्या धीटपणाचें विद्याधिकाऱ्यांना कौतुक वाटलें. त्यांनीं त्याला कांहीं उदाहरणें घातलीं. त्यानेंहि तीं चुटकीसरशीं सोडविलीं. विद्याधिकारी खूष झाले व त्यांनीं त्याला उत्तीर्ण (पास) म्हणून जाहीर केलें.

### श्रीमंतांच्या मुलांना धडा शिकविला

अभ्यासापेक्षां गजानन खेळ, कुस्त्या व मारामारी यांत जास्त रमत असे. अंगापिंडानें भरलेला असल्यामुळें

मारामारींत तो नेहमी पुढें असे. तो स्वतः दादागिरी करीत नसे, पण दुसऱ्यांची दादागिरी तो कधींच सहन करीत नसे. शाळेंतील कांहीं श्रीमंतांचीं मुलें अतिशय ताठ्यानें वागत. गरीब मुलांची टवाळी करीत, अपमान करीत. याला तें सहन होईना. दोनतीन वेळां त्यांना त्यानें समजुतीनें सांगण्याचा प्रयत्न केला; पण त्यांची गुर्मी कांहीं कमी होईना. मग गजाननानें त्यांना चौदावें रत्न दाखविण्याचें ठरविलें.

एक चांगला मोका साधून आपल्या मित्रांच्या मदतीनें त्यांपैकीं दोनतीन मुलांना त्यानें चांगलें तिंबून काढलें. तीं मुलें रडत रडत घरीं गेलीं. झालें, मुलांचे पालक संतापले. रागारागानें हातांत चाबुक घेऊनच ते शाळेंत आले. शिक्षकांना व मुलांना अद्वातद्वा बोलूं लागले. निधड्या छातीचा गजानन पुढें आला. त्यांच्या मुलांनीं ज्यांना ज्यांना त्रास दिला होता, त्यांच्या चिठ्ठ्या त्यानें आधींच घेऊन ठेवलेल्या होत्या. त्या त्यांच्यापुढें धरीत त्यानें त्या पालकांना सांगितलें, "आपल्या चिरंजिवांच्या या लीला आधीं वाचा आणि मग आम्हांला बोला. गरिबांचीं मुलें म्हणजे कांहीं परसांतली भाजी नाहीं."

गजाननाच्या धीटपणानें ते थोडेसे वरमले. त्यांनीं त्या चिठ्ठ्या वाचल्या. आपल्या लाडक्या लेकरांच्या लीला वाचून ते संतापले. हातांत आणलेल्या चाबकानें त्यांनीं मग आपल्या मुलांनाच सडकावलें. गजाननला त्यांनीं शाबासकी दिली आणि सांगितलें, "परत जर यांनीं कोणाला त्रास दिला तर चांगले सडकून काढा. सोडूं नका." अर्थात पुढें तसा कांहीं प्रसंगच आला नाहीं ती गोष्ट निराळी !

## जुम्मादादांच्या आखाड्यांत प्रवेश

वयाच्या आठव्या वर्षापासूनच गजाननाला आखाड्याचा नाद लागला. जुम्मादादांच्या आखाड्यांत तो रोज सकाळ-सायंकाळ जाऊं लागला. जुम्मामिया त्यावेळीं ९२ वर्षांचे होते. पण याहि वयांत ते आपल्या शिष्यांना कुस्ती शिकवीत. जुम्मादादा अतिशय निःस्पृह गृहस्थ होते. आजन्म ब्रह्मचारी राहून आपणाला अवगत असलेल्या व्यायाम, अस्थिसंधान, बिन्नोट, युनानी वगैरे विद्यांचा लोकोपकारार्थ त्यांनीं विनियोग केला. ११० वर्षांची आयुर्मर्यादा लाभलेल्या या उस्तादाला कांहींतरी किमया येत असली पाहिजे असा त्यावेळीं समज होता. त्यांची शिष्यपरंपरा फार मोठी होती.

गजानन दादांची कुस्ती पहात राही. डावांचें निरीक्षण करी. वृद्ध दादाची ती तडफ पाहून त्याला आश्चर्य वाटे. दादांनीं त्याला जणुं भारून टाकलें. गजाननाची इतक्या लहान वयांतील हुशारी पाहून दादा खूष होत. १२ वर्षांचा असतांनाच गजानन २५० दंड व ५०० बैठका मारूं लागला. जोडीला मल्लखांबाच्या उड्या आणि आढ्या असतच. अर्थात गजाननाला केवळ कुस्ती करणारा मल्ल व्हायचें नव्हतें. सर्व भारतीय व्यायामप्रकारांची माहिती मिळवून शारीरिक शिक्षण-तज्ज्ञ होण्याची त्याची मनीषा होती. नुसत्या दंड-बैठका घालून तो स्वस्थ बसत नसे. लकडी, जोडी, दांड-पट्टा, फरीगदका, मल्लखांब वगैरे गोष्टींचा अभ्यासहि त्यानें सुरू केला. पोहणें व घोड्यावर बसणें हे त्याचे आवडते छंद झाले.

## दंगलींत बक्षिसें मिळविलीं

बडोद्याला दर नागपंचमीला मर्दानी खेळांची मोठी दंगल भरत असे. सोळा वर्षांच्या गजाननानें जोडी व फरीगदका यांच्या चढाओढींत भाग घेण्याचें ठरविलें. त्यासाठीं त्यानें खूप मेहनत केली होती. २७ शेर वजनाच्या जोडीचे एक हजार हात त्यानें अखंडपणें फिरवून दाखविले व ती जोडी बक्षीस म्हणून मिळविली. इतकेंच नव्हे तर त्यापेक्षांहि अधिक वजनाची जोडीहि त्यानें त्याच दिवशीं पटकावली. दुसऱ्या दिवशीं फरीगदका छूट होती. त्यांतहि त्याची सरशी झाली. त्या दिवसापासून गजानन माणिकला लोक उत्तम व्यायामपटु म्हणून ओळखूं लागले.

व्यायामाचें वेड लागलेल्या माणिकनें घराकडे मात्र कधींच दुर्लक्ष केलें नाहीं. वडिलांची लाकडाची वखार होती. कांहीं कामानिमित्त वडील परगांवीं गेले म्हणजे माणिक वखारीचें सर्व काम पाही.

## चोरांशीं झटापट

एकदां मोठा जिवावरचा प्रसंग माणिकवर आला होता. बडोद्याहून तीन मैलांवर असलेल्या अटलादरा गांवीं त्याचे वडील कांहीं कामानिमित्त बरेच दिवस मुक्कामाला होते. वखारीवरील विक्रीचा गल्ला रोज रात्रीं दहा वाजतां वडिलाकडे अटलादऱ्यास पोंहोचविण्याचें काम माणिकला करावें लागे. हातांत दंडा व सोबतीला कुत्रा येवढ्याच जामानिम्यानिशीं तो एकटाच रोज रात्रीं चालत तेथें जात असे. चोरांना याचा सुगावा लागला. एका रात्रीं

त्याच्यावर पाळत ठेवून अर्ध्या रस्त्यावर त्यांनीं माणिकवर हल्ला केला. माणिकनेंहि दंडा फिरवून त्यांचा प्रतिकार केला. एकदोघांना लोळवून तो धूम ठोकून सुटला. चोरांनींहि पाठलाग केला. गांव जवळ आलेला पाहून माणिकला धीर आला. पुन्हां झटापट सुरू झाली. चोरांची संख्या बरीच होती. गजानन वरून दंडयानें एकेकाचें डोकें शेकी तर खालून त्याचा कुत्रा त्यांच्या पायाचे लचके तोडी. कितीतरी वेळ ही धुमश्चक्री चालू होती. आपला टिकाव लागत नाहीं असें पाहून चोर परत फिरले व पसार झाले. या झटापटींत लोखंडी खिळयांनीं मढवलेली एक काठी माणिकनें चोरांकडून काढून घेतली. ती काठी माणिकच्या पराक्रमाची खूण म्हणून जतन करून ठेवलेली आहे. या झटापटींत माणिकचा कुत्रा मात्र कामास आला.

**माणिकचें ध्येय ठरलें**

मराठी शिक्षण पूर्ण झालें. पण व्यायामाचें माणिकला एवढें वेड लागलें कीं इंग्रजी शिकून कोणीतरी मोठा अधिकारी व्हावें हें त्याला पटेना. जुम्मादादासारखेंच आजन्म ब्रह्मचारी राहून व्यायामविद्येची उपासना करावी, देशभर त्याचा प्रचार करावा व दीनदुबळयांची सेवा करण्यांत जीवन व्यतीत करावें असें त्याला वाटे. माणिकनें केवळ पहिलवानी करण्यांत आयुष्य घालवावें असें दादांनाहि वाटेना. त्याच्या हातून कांहींतरी भव्य व्हावें, दिव्य घडावें असें त्यांना वाटे. त्याची तडफ व तेज पाहून तो एक मोठा माणूस होईल अशी त्यांना खात्री वाटत होती. लोकांना

व्यायामाची गोडी लावून भारतीय व्यायामविद्येचा त्यानें देशभर प्रचार करावा व दीनदुबळ्यांची सेवा करून महान् सेवक व्हावें असें त्यांना वाटे, व त्या दृष्टीनें त्यांचें व्यक्तिमत्त्व घडविण्याचा ते प्रयत्न करूं लागले.

दीनदुबळ्यांची सेवा करण्याचें प्रभावी साधन म्हणजे हकिमी विद्या. या विद्येंत त्यानें तरबेज व्हावें म्हणून दादांनीं त्याची हकीमसाहेबांकडे सोय केली. हकिमी विद्या शिकण्यासाठीं फारसी भाषा हवी. माणिक आतां फारसी शिकूं लागला. दोनचार महिन्यांत तो फारशी लिहूं वाचूं लागला व हकीमसाहेबांकडे औषधें खलूं लागला. अस्थि-संधान विद्या ( बोन सेटिंग ) स्वतः दादा शिकवीत. या विद्येची त्याला इतकी गोडी लागली कीं, वर्षभरांत तो त्यांत प्रवीण झाला. वयाच्या सोळाव्या वर्षापासून तो हातपाय मोडलेले रोगी दुरुस्त करूं लागला व त्यांचा दुवा घेऊं लागला.

**बिन्नोटचें शिक्षण**

याच सुमारास त्याला शस्त्रविद्येच्या शिक्षणाचें वेड लागलें. दांडपट्टा व फरीगदका तो उत्तम करी. बिन्नोटचें ज्ञान मिळविण्याची आतां त्याला इच्छा झाली. बिन्नोटचे त्यावेळचे उस्ताद गोषसाहेब त्यावेळीं गुडघी रोगानें आजारी होते व हकीमसाहेबांचें औषध त्यांना सुरू होतें. गोषसाहेबां-साठीं माणिक स्वतः जंगलांतून निरनिराळ्या औषधी वनस्पति आणून देई व हकीमसाहेबांच्या सल्ल्यानें त्यांना रस काढून देई. माणिकच्या कष्टाचें व सेवेचें गोषसाहेबांना

फार कौतुक वाटे. थोडा आराम वाटल्याबरोबर माणिकला ते बिन्नोटचे हात शिकवूं लागले. शिकवितांना त्यांना आपल्या रोगाचा विसर पडे. आपण फार थोड्या दिवसांचे सोबती आहोंत याची त्यांना खात्री होती. म्हणून उरलेल्या दिवसांत माणिकला बिन्नोटचें संपूर्ण ज्ञान करून द्यावें अशी त्यांना तळमळ लागली.

अखेर तो दिवस उगवला. मृत्युशय्येवर असतांनाच त्यांनीं माणिकला बोलावणें पाठविलें. माणिक येतांच त्याच्या अंगावर बिन्नोटचा एक गदका फेकून व दुसरा आपल्या हातांत येऊन ते ताडूकन उभ राहिले. मित्रमंडळींनीं विरोध करून पाहिला, माणिकनेंहि समजूत घातली. पण ते कसले ऐकतात ! माणिकवर ते ओरडले, “अबे क्या देखता है ! चल लगाव.” बिन्नोटचे हात सुरू झाले. फक्त दहा पंधरा मिनिटें शिक्षण चाललें असेल, पण त्याहि वेळांत कठीणांतले कठीण हात शिकवून झाले. उस्ताद थकले. शरिराचा तोल गेला. शुद्ध जाऊं लागली. ते जमिनी-वर कोसळणार तोंच माणिकनें चपळाई करून त्यांना झेललें व बिछान्यावर निजविलें. थोड्या वेळानें शुद्धीवर येऊन त्यांनीं माणिकसह सर्वांवर समाधानाची नजर फिर-विली. मरतां मरतां कां होईना आपल्या शिष्याला आपण पूर्ण ज्ञान दिलें हें समाधान त्या नजरेंत होतें. आणि थोड्याच वेळानें हें जग सोडून ते चालते झाले.

जुम्मादादासारखा आदर्श गुरु, गोषसाहेबांसारखे थोर उस्ताद व हकीमसाहेबांसारखे तज्ज्ञ शिक्षक आपल्याला लाभले याचा माणिकला मोठा अभिमान वाटे.

## जोधपुरांत कुस्ती गाजविली

आपल्याला मिळालेलें ज्ञान काय प्रतीचें आहे, त्याचा कस काय आहे हें पहाण्याची संधि माणिकनें कधीं दवडली नाहीं. जोधपुरांत दरवर्षी कुस्त्यांची दंगल भरत असे. जोधपूरचे महाराज कुस्त्यांचे फार शोकीन. कुस्त्या पहाण्यासाठीं ते जातीनें हजर रहात. या दंगलींत भाग घेण्याचें ठरवून माणिक आपल्या मित्रांसह जोधपुरास गेला. भारतांतील मोठमोठे पहिलवान कुस्ती करण्यासाठीं आले होते. माणिकनें पहिल्याच दिवशीं एकदोन कुस्त्या जिकल्या; पण त्यानें त्याचें समाधान झालें नाहीं. उत्तर भारतांतील त्या वेळचा सुप्रसिद्ध पहिलवान अमीरबक्ष ह्याच्याशीं खेळण्याची त्याची इच्छा होती. पंचांजवळ तशी त्यानें परवानगी मागितली; पण पंच परवानगी देईनात. माणिकला त्यांनीं समजावून सांगितलें, "पहिलवानी हा तुमचा पेशा दिसत नाहीं. अमीरबक्ष हा फार मातब्बर पहिलवान आहे. त्याच्या भानगडींत तुम्हीं पडूं नका." पण माणिक हट्ट सोडीना. शेवटीं प्रकरण खुद्द महाराजांपुढें गेलें. महाराजांनीं परवानगी दिली. कुस्ती ठरली. अमीरबक्ष टंगेल हा कुशल खेळाडू म्हणून प्रसिद्ध होता. टांग मारण्यांत तो पटाईत होता म्हणून त्यास "टंगेल" म्हणत. कुस्ती सुरू झाली. पेंचावर पेंच सुरू झाले व तोडीस तोड मिळूं लागली. तब्बल पाऊण तास कुस्ती चालली. अंधार पडूं लागला. निकाल लागेना. शेवटीं कुस्ती थांबवावी लागली.

दुसऱ्या दिवशीं पुन्हां कुस्ती सुरू झाली. दोन्ही वीरांचें कौशल्य पाहून प्रेक्षक खूष झाले. सव्वा तास कुस्ती चालली.

पण निकाल लागेना. शेवटीं दोघांना सारख्याच दर्जाचे खेळाडू ठरवून कुस्ती सोडविण्यांत आली. महाराजांनीं उभयतांना पासंगी पोषाख अर्पण केला.

असीरबक्षानें माणिकची पाठ थोपटली. उस्तादाबद्दलची पूसतपास सुरू झाली. प्रख्यात पहिलवान छोटे नशीबखान यांचे पिरोजखान व जुम्मादादा हे दोन्ही शिष्य. अमीरबक्ष पिरोजखानाचा शिष्य तर माणिकराव जुम्मादादांचा. दोघेहि एका घराण्याचे शिष्य ठरले. गुरुबंधू म्हणून त्यांनीं एकमेकांस कडकडून मिठी मारली.

यानंतर माणिकनें आणखी एकदोन कुस्त्या मारल्या. महाराज तर माणिकच्या कुस्तीवर बेहद्द खूष झाले. पांचसहा दिवस त्यांनीं त्याला आग्रहानें ठेवून घेतलें. संस्थानी पाहुणचार झोडून माणिक बडोद्यास परत आला.

**युरोपांत जाण्याची संधि आली होती; पण–**

बेंजामिन नांवाच्या युरोपियन गृहस्थानें जोधपूरच्या दंगलींत माणिकची कुस्ती पाहिली व कुस्तींतील त्याचें नैपुण्य पाहून तो इतका खूष झाला कीं युरोपांत त्याच्या कुस्त्या कराव्या असें त्याला वाटूं लागलें. माणिकची गांठ घेऊन त्यानें आपली मनीषा व्यक्त केली. माणिकनें सांगितलें, "आपण बडोद्यास या. वडील मंडळींचा सल्ला घेऊन आपण योग्य तें ठरवूं."

बेंजामिन बडोद्यास आला. माणिकच्या वडिलांची त्यानें संमति मिळविली, पण दादा संमति देईनात. पहिलवानी हा असा पेशा आहे कीं, माणूस एकदां त्यांत गुरफटला

कीं त्यांतून बाहेर पडणें त्याला शक्यच होत नाहीं. माणिकबद्दलच्या दादांच्या अपेक्षा कांहीं निराळच्या होत्या. पहिलवानीपेक्षां त्यानें कांहींतरी निराळें करून दाखवावें असें त्यांना वाटे. ते होकारहि देईनात व नकारहि देईनात. माणिक योग्य तें समजला. बेंजामिनबरोबर युरोपांत जाण्याचा बेत त्यानें रद्द केला.

यानंतर जुनागड, धार, देवास, उदेपूर, जयपूर, लाहोर, ग्वाल्हेर आदि ठिकाणीं माणिकनें कुस्त्या केल्या व उत्तम व्यायामपटू व कुस्तीगीर म्हणून नांवलौकिक मिळविला.

लोक माणिकला आतां 'प्रोफेसर माणिकराव' म्हणून ओळखूं लागले.

### हिमालयाकडे प्रयाण

१८९८ सालची प्लेगची सांथ आली. माणिकरावांनाहि प्लेगनें झपाटलें. पण जांघेंतील गांठी स्वतःच्या हातानें कापून धगधगीत निखाऱ्यावर त्या त्यांनीं जाळून टाकल्या व आपला बचाव करून घेतला. पण या सांथींत त्यांचे अनेक जिवलग मित्र, तीन भाऊ, एक बहीण व वडील दगावले. माणिकरावांना आत्यंतिक दुख झालें. त्यांचें मन कामांतून साफ उडालें. बडोदें सोडून कोठेंतरी निघून जावें असें त्यांना वाटूं लागलें. आणि एके दिवशीं त्यांनीं हिमालयाचा रस्ता धरला.

माणिकराव असे अचानकपणें निघून गेल्यामुळें त्यांच्या वृद्ध मातोश्री व गुरु जुम्मादादा यांना किती दुःख झालें असेल ?

हिमालयाच्या सान्निध्यांत माणिकराव सहा महिने राहिले. खूप भटकले. अनेक साधूंचें त्यांनीं दर्शन घेतलें. नैसर्गिक सौन्दर्यानें विनटलेल्या त्या हिमराजाच्या दर्शनानेंच त्यांची विषण्णता कमी झाली. उत्तुंग पर्वतराजींच्या शिखरांचें दर्शन होतांच त्यांना आपल्या ध्येयशिखराची आठवण झाली आणि ते बडोद्यास परत आले.

त्यांना परत आलेले पाहून त्यांच्या मातेस व गुरूस फार आनंद झाला.

**आखाड्याची संपूर्ण जबाबदारी शिरावर घेतली**

दादांची प्रकृति खालावत चालली होती. त्यामुळें आखाड्याचें बरेंचसें काम माणिकरावांनाच पहावें लागे. बदललेल्या कालानुरूप आखाड्याच्या जुन्या कार्यपद्धतींत बदल करावा व शास्त्रशुद्ध पद्धतीनें शिक्षण देणाऱ्या व्यायामशाळेंत त्यांचें रूपांतर करावें असें माणिकरावांना वाटे. दादानांहि त्याचे विचार पटत. अखेर एके दिवशीं त्यांनीं आपल्या सर्व शिष्यांसमोर जाहीर केलें कीं, यापुढें आखाड्याची सर्व जबाबदारी माणिकरावानें सांभाळावी.

आणि दुसऱ्याच दिवशीं म्हणजे ८ डिसेंबर १९०४ रोजीं दादांचें प्राणोत्क्रमण झालें.

वयाच्या अवघ्या २६ व्या वर्षीं सर्वांच्या आग्रहानें माणिकरावांनीं आखाड्याची जबाबदारी स्वीकारली.

आखाड्याचें नांव आतां "जुम्मादादा व्यायाममंदिर" असें ठेवण्यांत आलें. दंड, बैठका, जोडी, कुस्ती यांच्या जोडीला आतां निरनिराळे देशी खेळ व व्यायामप्रकार

वेळापत्रकाप्रमाणें व शास्त्रशुद्ध रीतीनें शिकविलें जाऊं लागले. वयपरत्वें अभ्यासक्रम ठरविण्यांत आला. निरनिराळीं नोंदपत्रकें तयार झालीं. प्रगतिपुस्तकें सुरू झालीं. वाचनीय पुस्तकें आलीं. नियमावली तयार झाली. उद्बोधक म्हणी व चित्रें भिंतीवर लागलीं. निरनिराळे उत्सव सुरू झाले. सभासमारंभ होऊं लागले. रोगप्रतिकारार्थ योजना तयार झाल्या. मुलांची संख्या वाढूं लागली. पांढरपेशा वर्गांतील लहान मोठीं मुलें भराभर येऊं लागलीं. जुन्या आखाड्याचें रूप पालटून त्याला खऱ्या-खुऱ्या व्यायाममंदिराचें आदर्श स्वरूप प्राप्त झालें.

आणि तें १९०६ साल उजाडलें. कलकत्ता काँग्रेसच्या अधिवेशनाच्या वेळीं शस्त्रकलेच्या नैपुण्यानें माणिकरावांनीं सगळ्यांना थक्क करून सोडलें; व आखाड्यांतील लाल मातींत लोळणारा तरुणहि आपल्या देशाचें नांव राखूं शकतो हें त्यांनीं सुशिक्षितांना दाखवून दिलें.

**नवे विचार**

पोषाखी पांढरपेशा वर्गाला व्यायाम हा उनाडटप्पू लोकांचा व्यवसाय वाटे. माणिकरावांना त्यांचा हा गैरसमज दूर करावयाचा होता. निरोगी जीवन जगण्यासाठीं व दैनंदिन कामें करतांना लागणारी शक्ति व उत्साह टिकविण्यासाठीं व्यायामाची व निरोगी संवयींची फार आवश्यकता आहे हा नवा दृष्टिकोन समाजाला पटवून देण्याचें महान् कार्य माणिकरावांनीं पत्करलें. आखाड्यांत व सर्वसाधारण समाजांत पहिलवानांना फारसें मानाचें स्थान

नाहीं हें जरी खरें असलें तरी याच आखाड्यांच्या एकंदर कार्यपद्धतीमध्यें जर बदल घडवून आणला तर तीं उत्तम सांस्कृतिक केंद्रें बनूं शकतील व त्या आदर्श नागरिक तयार करणाऱ्या संस्था होऊं शकतील हें माणिकरावांनीं जाणलें. कुस्ती, फरीगदका, दांडपट्टा, लाठी वगैरे व्यायाम-प्रकारांनीं तरुणांमध्यें लढाऊ वृत्ति, आत्मविश्वास, धैर्य, चिकाटी, सोशिकता वगैरे गुणांचा विकास साधतां येतो, तर हुतुतु, खोखो वगैरे सांधिक खेळांनीं आज्ञाधारकपणा, खेळाडू वृत्ति वगैरे गुणांचा विकास होऊं शकतो हें माणिकरावांनीं ओळखलें. म्हणून आपल्या कार्यक्रमामध्यें त्यांनीं वरील सर्व व्यायामप्रकारांना त्यांतील शैक्षणिक व सामाजिक मूल्यां-प्रमाणें स्थान दिलें.

### आणि नवे प्रयोग

येवढेंच करून ते थांबले नाहींत, तर लाठी, लेझीम, लकडी, फरीगदका, जंबिया, भाला वगैरेंचा अभ्यास सुलभ व्हावा म्हणून त्यांच्या हाताच्या व वारांच्या त्यांनीं निरनिराळ्या सांखळ्या बसविल्या व शास्त्रशुद्ध मांडणी केली. त्यामुळें केवळ वैयक्तिकरीत्या केले जाणारे व्यायाम-प्रकार आतां सामुदायिकरीत्या करतां येऊं लागले. त्यांनीं सर्वांगसुंदर व्यायामाची नवी कवायत रूढ केली. शरीर-शास्त्र, मानसशास्त्र व समाजशास्त्र यांच्या मूल्यांचा विचार करून सर्व देशी व्यायाम-प्रकारांची त्यांनीं शास्त्र-शुद्ध अशी नवी उभारणी केली.

भारतीय लष्करांत व पोलिसांत आतां हिंदी आज्ञाशब्द आलेले आहेत. परंतु प्रो. माणिकरावांनीं सैनिक-संचलनासाठीं लागणारे हिंदी आज्ञाशब्द १९२० सालींच तयार केले होते. आणि आपल्या व्यायाममंदिरांत ते रूढ करून इंग्रजीइतकेच किंबहुना इंग्रजीपेक्षांहि ते अधिक परिणामकारक आहेत असें श्रीमंत सयाजीराव महाराजांना पटवून दिलें होतें.

प्रो. माणिकराव हे खरेखुरे योजक होते. त्याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे 'बडोदा लेझीम' ! दरवर्षीच्या गणपतिउत्सवांत माणिकराव लोकांना निरनिराळ्या व्यायामप्रकाराचें उत्तम प्रात्यक्षिक दाखवीत. पण १९२१ च्या तंग राजकीय वातावरणामुळें लाठीच्या व शस्त्रांच्या प्रात्यक्षिकांवर बंदी घालण्यांत आली. माणिकरावांना चिंता वाटूं लागली. 'लाठीसारखा मर्दानी कार्यक्रम बंद करणें म्हणजे तरुणांच्या अस्मितेवर घाला घालण्यासारखेंच आहे.'—माणिकराव विचार करूं लागले. 'हातांत लाठी नसली तरी लाठीच्या कृति जिवंत राहिल्या पाहिजेत.' त्यांना उपाय सुचला. लाठीऐवजीं हातांत लेझीम घेऊन लाठीच्या चौमुख्या, बेली, पवित्रे सर्व त्यांनीं लेझीमच्या चार ठोक्यांवर बसविले व त्या वर्षीच्या गणेशोत्सवांत लेझीमचा हाच कार्यक्रम सादर केला. तो इतका आकर्षक ठरला कीं त्या दिवसापासून "बडोदा लेझीम" हा लेझीमचा नवा प्रकार रूढ झाला. अशा प्रकारें प्रो. माणिकराव देशी खेळांचे नवे नवे प्रयोग करीत होते. शास्त्रीय बैठक देऊन

त्यांना आकर्षक रूप आणीत होते व ते प्रेक्षणीय व लोकप्रिय करण्याचा प्रयत्न करीत होते.

**दिल्ली गाजविली !**

१९२४ सालीं दिल्ली येथें ऑलेंपिक सामने भरण्याचें ठरलें. माणिकरावांना आपलें कर्तृत्व दाखविण्याची नामी संधि प्राप्त झाली. निवडक अशा २४ खेळाडूंचें एक पथक कॅ. गुप्ते यांच्या नायकत्वाखालीं त्यांनीं दिल्लीस पाठविलें. या खेळाडूंनीं लाठी, लेझीम, जंबिया, फरिगदका इत्यादींचीं प्रात्यक्षिकें इतकीं अप्रतिम केलीं कीं त्या वेळचे व्हाईसरॉय लॉर्ड रीडिंग व लेडी रीडिंग यांनीं देखील प्रशंसोद्‌गार काढले. 'टाईम्स', 'डेली मेल' वगैरे इंग्रजी पत्रांनींहि त्यांचा गौरवपूर्ण शब्दांत उल्लेख केला होता.

**माणिकरावांची देशसेवा**

शारीरिक शिक्षक हें माणिकरावांचें ध्येय असलें तरी त्यांनीं राजकीय चळवळींत प्रत्यक्षाप्रत्यक्ष वेळोवेळीं भाग घेतला आहे. स्वदेशीच्या चळवळींत तर त्यांनीं जातीनें भाग घेतला होता. व्यायाममंदिरांत त्यांनीं हातमाग सुरू केले होते. खादी वापरण्यास सुरुवात करून मरेपर्यंत तें व्रत कायम ठेवलें होतें. दांडिया बाजारांत स्वदेशी साखरेचें दुकान थाटून रावपुऱ्यांत खादी भांडार घालण्यास त्यांनीं मदत केली. पैसाफंडासाठीं तें दारोदार भटकले. क्रांतिकारकांनाहि त्यांच्या व्यायाममंदिरांत आश्रय मिळे. सुप्रसिद्ध क्रांतिवीर सरदार पृथ्वीसिंह त्यांच्याकडे सहा

महिने व्यायामाचें शिक्षण घेण्यासाठीं राहिले होते. त्यानंतर 'स्वामीराव' या नांवानें काठेवाडांत ते कित्येक वर्षें व्यायामप्रचाराचें कार्य करीत होते. पेणचे जोशी, खुदीराम बोस हेहि कांहीं दिवस त्यांच्याजवळ रहात होते.

**आणि समाजसेवा**

राजकीय कार्यापेक्षां 'जुम्मादादा व्यायाम मंदिर' हें समाजकार्याचें खरेखुरें केंद्र बनलें. १९०१ सालापासून त्यांनीं गणेशोत्सव सुरू केला. त्या निमित्तानें ते लाठी, लेझीम, फरीगदका इत्यादींचीं प्रात्यक्षिकें तर करीतच; शिवाय जोडीला सामाजिक व राजकीय विषयांवरील व्याख्यानें, प्रवचनें, कीर्तनें, भजनें, गायन, वेदपठण वगैरे कार्यक्रमांचीहि कांहीं दिवस धमाल उडवून देत.

तरुणांतील क्षात्रतेज जागृत करण्यासाठीं श्रीशिवाजी-उत्सव साजरा करण्यास त्यांनीं सुरुवात केली. लहानसें शिवाजीमंदिर बांधून त्यांत त्यांनीं श्रीछत्रपतींचा अर्धपुतळा बसविला. याहि उत्सवांत शस्त्रविद्येचीं प्रात्यक्षिकें होत व छत्रपतींच्या जीवनावर निरनिराळीं व्याख्यानें व कीर्तनें होत.

ज्या ज्या वेळीं बडोद्यावर नैसर्गिक आपत्ति आली, त्या त्या वेळीं माणिकराव धांवून गेले. १९१८ सालची इन्फ्लुएंझाची म्हणजे मानमोडीची ती भयंकर सांथ ! तिची आठवण होतांच जुन्या लोकांच्या अंगावर अजूनहि शहारे येतात. एकेका घरांत तीनतीन चारचार प्रेतें पडायचीं. रोज शंभर दीडशें लोकांना अग्नि द्यावा लागायचा. अशा वेळीं

पंचरसाच्या व खोकल्याच्या गोळ्या बनविण्याचें काम चोवीस तास ते आपल्या शिष्यांसह करीत. प्रेतदहनास लागणाऱ्या साहित्याचें दुकान त्यांनीं व्यायाम मंदिरांतच उघडलें. शहराच्या निरनिराळ्या भागांत औषधें पुरविण्याचें व प्रेतें वाहण्याचें काम त्यांनीं रात्रंदिवस केलें आणि नगरवासियांचा दुवा मिळविला.

१९२७ सालचा विश्वामित्री नदीचा महापूर म्हणजे बडोद्याचा जलप्रलयच ! फत्तेपुरा, दांडियाबाजार, सयाजीगंज, स्टेशन वगैरे भाग अक्षरशः जलमय झाला. रात्रीची वेळ, भीषण अंधकार पसरलेला, अशा वेळीं माणिकरावांनीं बाजांचे तराफे तयार करून पाण्यांत सोडले. घरांच्या छपरांवर, माडीवर, खांबावर जीव मुठींत धरून बसलेल्या लोकांना सुरक्षितपणें आपल्या व्यायाम मंदिरांत आणण्याचें काम सुरू झालें. पण नदीपलीकडील सयाजीगंजमधील लोकांना कसें वांचवायचें ? नदी तर दुथडी वाहत होती. नदीपार होणें म्हणजे जिवाशीं खेळ. तरीहि पोहत पैलतीरीं जाण्याचें त्यांनीं ठरविलें. लोकांनीं विरोध केला. पण ते पैलतीरीं गेलेच आणि तेथेंहि त्यांनीं अनेकांचे प्राण वांचविले.

पूर ओसरला. पण पुरामुळें उद्ध्वस्त झालेला भाग किती भयानक दिसत होता ! गृहहीन झालेलीं व अंगावरील वस्त्रानिशीं जिवंत राहिलेलीं तीं माणसें, जमीनदोस्त झालेली तीं घरें, त्याखालीं दडपलीं गेलेलीं तीं प्रेतें, सर्वदूर पसरलेली ती घाण आणि त्यानें गच्च झालेले ते रस्ते पाहून अंगावर शहारे येत.

माणिकरावांनीं कमर कसली. घरें उसकटण्याचें, रस्ते मोकळे करण्याचें काम सुरू झालें. निधि (फंड) उभा झाला. अन्नसत्र चालू केलें. मोफत धान्याचें व कपड्यांचें दुकान उघडलें गेलें. घरें दुरुस्त करण्यासाठीं अगर उभीं करण्यासाठीं मदत सुरू झाली. कित्येक महिने हें काम चाललें. माणिकराव जिवाचें रान करीत होते. गोरगरिबांना ते देव वाटूं लागले.

## 'राजरत्न' माणिकराव

श्रीमंत सयाजीराव महाराज त्यावेळीं विलायतेला होते. प्रजेवर कोसळलेल्या या आपत्तीनें त्या दयाळू राजाचें हृदय पाझरलें. संकटग्रस्तांच्या मदतीसाठीं त्यांनीं २५ हजार रुपये माणिकरावांकडे पाठविले. माणिकरावांच्या सेवाकार्याची बातमी ऐकून त्यांना फार अभिमान वाटला. त्यांनीं माणिकरावांना 'राजरत्न' पदवी बहाल केली व रौप्यपदक देऊन त्यांचा सन्मान केला.

## अ. म. शा. शि. मंडळाचे अध्यक्ष

माणिकरावांच्या शारीरिक शिक्षण कार्याचें महत्त्व महाराष्ट्रालाहि पटलें. अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण मंडळाच्या नाशिक अधिवेशनासाठीं अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. पण ते नुसते नांवाचे अध्यक्ष झाले नाहींत, तर मंडळाच्या कार्याच्या प्रचारार्थ सबंध महाराष्ट्रभर त्यांनीं दौरा काढला. ठिकठिकाणीं त्यांचा जाहीर सत्कार झाला व त्यांना अनेक मानपत्रें मिळालीं.

## माणिकरावांचें शस्त्रागार

माणिकरावांना शस्त्रें जमविण्याचा मोठा नाद. त्यासाठीं त्यांनीं पाण्यासारखा पैसा खर्च केला व मोठमोठ्या योद्धयांच्या तलवारी त्यांनीं मिळविल्या. अकबर, औरंगजेब, राजा मानसिंग, महाराणा प्रतापसिंह, छत्रपति शिवाजी, लॉर्ड मिंटो अशा कितीतरी योद्धयांच्या तलवारींचा त्यांनीं संग्रह केला. लहानमोठ्या शस्त्रांचें एक स्वतःचें शस्त्रागार त्यांनीं तयार केलें. येवढेंच नव्हे तर शस्त्रांची त्यांना उत्तम पारख असल्यामुळें श्रीमंत प्रतापसिंह गायकवाड यांच्या सूचनेवरून संस्थानी शस्त्रांचें योग्य वर्गीकरण करून 'प्रताप शस्त्रागार' म्हणून एक आदर्श शस्त्रागार त्यांनीं तयार करून दिलें.

## अस्थिसंधान विद्या

प्रो. माणिकराव यांच्या जीवनांतील आणखी एक अंग म्हणजे अस्थिसंधान विद्या. ही विद्या त्यांनीं स्वतः तर पूर्ण आत्मसात् केलीच, पण ती आपल्या अनेक शिष्यांना शिकवून त्यांनाहि त्यांत त्यांनीं तरबेज केलें. रोग्यांकडून त्यांनीं कधीं पैसे मागितले नाहींत. रोग्यांची सोय व्हावी म्हणून त्यांनीं एक स्वतंत्र अस्थिसंधनालय बांधलें. लहान-थोर, गरीब-श्रीमंत असा भेदभाव न बाळगतां अखंड ६० वर्षांत त्यांनीं हजारों रोग्यांना बरें केलें.

## अमृतमहोत्सव

प्रो. माणिकराव यांच्या वयाला पंचाहत्तर वर्षें पूर्ण होत आलीं, तेव्हां त्यांच्या थाटाचा अमृतमहोत्सव साजरा करावा असें त्यांच्या शिष्यांना व चहात्यांना वाटूं लागलें. त्यासाठीं तीन लाख रुपये जमविण्याचें ठरलें. श्रीमंत फत्तेसिंहराव गायकवाड यांनीं दहा हजार रुपये देऊन सुरवात केली. कार्याचीं चक्रें जोरांत फिरूं लागलीं. तीन लाखाचा संकल्प पुरा झाल्यावरच समारंभ साजरा करावा असा कांहींनीं हट्ट धरला.

इकडे मुंबईकरांनींहि स्वतंत्र उत्सव करण्याचें ठरविलें. प्रबोधनकार ठाकरे या उत्सवाचे स्वागताध्यक्ष म्हणून निवडले गेले. शिवाजी पार्कवरील श्रीसमर्थ व्यायाम मंदिर ही उत्सवाची जागाहि निश्चित झाली. २५ एप्रील १९५४ ही तारीख ठरली. न्यायमूर्ति गजेन्द्रगडकर यांची अध्यक्ष म्हणून अनुमति मिळविण्यांत आली. ठरलेल्या वेळीं माणिकराव सभास्थानीं आले. भगिनींनीं पंचारतीनें ओवाळलें. राष्ट्रध्वज उभारला गेला. स्वागताध्यक्ष श्री. ठाकरे भाषणासाठीं उभे राहिले आणि व्यासपीठ कचकलें. छत्रपति शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. कांहींच्या मनाची पाल चूकचुकली. माणिकराव हंसतमुखानें म्हणाले, "अरे, किरकोळ अपघात हा ! यांत अपशकून काय मानायचा ? माझी अद्याप २५ वर्षें बाकी आहेत देवाघरीं." सभेची जागा बदलली. अत्यंत गौरवपूर्ण शब्दांत माणिकरावांच्या कार्याचा गौरव करून गजेन्द्रगडकर म्हणाले, "माणिकरावांचें कार्य इतकें

विविध आणि थोर आहे कीं राजे लोकांनीं, पुढाऱ्यांनीं आणि समाजानें त्यांना दिलेल्या पदव्या त्यांच्या योग्यतेच्या दृष्टीनें कमीच पडतील. त्यांच्या कार्याचें सम्यग्‌दर्शन "नररत्न" या एकाच शब्दानें होणारें आहे. म्हणून मी त्यांचा "नररत्न माणिकराव" म्हणून गौरव करतों आणि नररत्न श्री छत्रपति शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचें हें सुंदर पदक त्यांना अर्पण करून त्यांचा सत्कार करतों."

## निर्याण

आणि त्यानंतर बरोबर एक महिन्यानें म्हणजे २५ मे १९५४ रोजीं बडोद्याचा हा व्यायामभास्कर अस्तास गेला. लोकांना आश्चर्याचा आणि दुःखाचा धक्काच बसला. कांहीं आजार नाहीं, दुखणें नाहीं. मग एकाएकीं हें झालें कसें ! अन्त्यदर्शनासाठीं सारें बडोदा शहर लोटलें. अन्त्ययात्रेसाठीं अलोट गर्दी जमली. स्मशानभूमीकडे यात्रा निघाली. परन्तु ऐनवेळीं श्रीमंत गायकवाड महाराजांचा हुकूम आला. अंत्ययात्रा 'कीर्तिमंदिरा' कडे निघाली. प्रो. माणिकरावांना 'कीर्तिमंदिरा'च्या आवारांत अग्निसंस्काराचा मान मिळाला. वास्तविक तो मान फक्त राजघराण्याचा; पण 'गरिबांच्या राजाला'हि तो मान मिळाला. चंदनाची चिता रचली गेली. त्यावर देह ठेवला गेला. मंत्राग्नि दिला गेला. चिता पेटली आणि त्या पार्थिव देहाची क्षणार्धांत राख झाली. जड अंतःकरणानें सर्वजण परत फिरले.

## "भाऊ" अमर आहेत !

जुम्मादादा माणिकरावांना "भाई" म्हणत. त्यांचे शिष्य त्यांना "भाऊ" म्हणत. "भाऊ" गेल्याचें ऐकून भारतभर पसरलेला त्यांचा शिष्यगण हळहळला. पार्थिव देहानें "भाऊ" गेले असले तरी आपल्या कार्यानें ते अमर आहेत. व्यायामाचे भीष्माचार्य म्हणून महाराष्ट्रांत त्यांचें नांव अमर राहील. बडोद्यांत त्यांनीं अशीं कांहीं जिवंत स्मारकें करून ठेवलीं आहेत कीं तरुणांनीं त्यांपासून स्फूर्ति घ्यावी, शक्ति घ्यावी. जुम्मादादा व्यायाममंदिर हा त्यांचा मूळ पाया. पण त्याच्या जोडीला त्यांनीं उमा सभागृह, सरस्वती व्यासपीठ, अस्थिसंधनालय, श्रीशिवाजी मंदिर, पोहण्याचा जलाशय इत्यादि गोष्टी निर्माण करून चिरंतन स्मारकें उभीं केलीं आहेत.

आजन्म ब्रह्मचारी राहून व्यायामविद्येच्या उपासनेंत ज्यानें आपलें संपूर्ण आयुष्य घालविलें, भारतीय व्यायाम-प्रकारांना शास्त्रशुद्ध रूप देऊन समाजांतील सर्व थरांमध्यें ते ज्यानें लोकप्रिय केले व व्यायाम-कार्याबरोबरच समाज-सेवेचें कंकण बांधून थोर समाजसेवक म्हणून ज्यानें नांव कमावलें, त्या व्यायाम-भीष्माचार्याला महाराष्ट्र कधींतरी विसरेल काय ?

९२७८ दि. २०।५।७९
बा. वा.
BVBK-0401248
BVBK-0401248

# कांहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून–'कांहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्ध्यर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रात अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

**तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना**

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा ध्यास : विजापूरकर
४. कादंबरीकार हरीभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : क. लॉरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फ्राय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशिया )
१४. बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई बी चीज उठाव : वुलवर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : अंताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कसबहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई
२६. सद्गुणी बनण्याची कला : फ्रँकलिन
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर
३०. खरा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विमामहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सँटा ड्युमाँ
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४०. शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फातला माणूस : हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिफले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटु : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें ?

प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : संच पेटी रु. २५.

**वोरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.**